तारीख - २३/८/२०२२

विषय : पुनर्निर्माण योजने साठी आवशक बाबींवर सखोल work shop.

पुणे पत्रकार सहकारी गृहरचने च्या पुनर्निर्माण संबंधी आवश्यक माहिती आपल्या सर्व सभासद तसेच त्यांचे कुटुंबीयांना देण्या साठी दिनांक २२/८/२०२२ रोजी संध्याकाळी संस्थे च्या सभाग्रहात एक work shop आयोजित केला होता ज्यात संस्थे च्या पुनर्निर्माण कार्या बद्दल च्या विधी सल्लगार एड्. किरण काबरा आणि श्री हर्षद कवडीकर यांनी मार्गदर्शन केले.

ह्या वर्क शॉप ला सभासद आणि त्यांचे कुटुंबीय मिळून ७७ लोकं (६६ + ११) उपस्थित होती.

ऍड. काबरा यांनी पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशन च्या मध्यमा तून पुनर्निर्माण करताना सभासदांना येणाऱ्या सर्व शंका, धोके, कायद्या ची व्यवस्था, पारदर्शकता आणि एकजुटी चे महत्व, घरांच्या मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागपत्रांची गरज, विकसक निवडताना आपल्या किमान आणि कमाल अटी कश्या ठरव्यावा सारख्या येणाऱ्या बहुतांशी प्रश्नांची आणि त्यांचे निराकरण कसे करता येते ह्या वर अत्यंत सोप्या शब्दात भाष्य केले.

नंतर त्यांनी तसेच श्री कावडिकर यांनी सभासदांच्या प्रश्नांना  समाधान कारक उत्तरं पण दिलीत

सभासदांना एक फीडबॅक फॉर्म पण देण्यात आला ज्यात  त्यांना पुनर्निर्माण संबंधात अजून काही प्रश्न असल्यास ते पंच समित च्या माध्यमातून सल्लागारांना विचारू शकतील. हे फॉर्म्स सभासदानी ३ / ४ दिवसात पंच समिती कडे भरून द्यायचे आहेत.

ह्या पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशन ची सगळी माहिती आपल्या संस्थे च्या पुनर्निर्माण वेब साईट वर दिली आहे

प्रदीप नेवाळकर

पंच समिती च्या वती ने